# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/६४/२०१८/२४५ दि.२७.०९.२०१८

प्रति,
श्री. रावसाहेब आहिरे
अध्यक्ष, आसरा को-ऑप. सोसायटी लि.,
३, आसरा बिल्डींग, ब्राम्हणवाडी,
कुर्ला (प), मुंबई -४०००७०.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दिनांक ०१.०९.२०१८ रोजीचा अर्ज माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) अन्वये आयोगाच्या कार्यालयास दि. २५.०९.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| अ.क्र | Information Sought / **माहितीचा तपशिल** | Information Provided/**उपलब्ध माहिती** |
|---|---|---|
| 1 | श्री. शरद राजाराम जगताप यांस सिटी सिव्हील कोर्टाने सेपरेट रहिवासी मिटर न देण्याचे आदेश दिले पण हायकोर्टाने मेरिटवर कमर्शियल मिटर देण्याचे आदेश दिले. कोणतीही बीएमसी व सोसायटीची परमिशन नसतांना व 440 व्हॉलचे रिलायन्सने मिटर देउन दोन्हींही कोर्ट ऑर्डरचा अवमान केला असून शरद जगतापचे वडील स्टेशनच्या त्यांच्या दुकानात चोरून लाईल दुस-यांना देतात तरी त्यांच्यावर पोलीस केस होत नाही या आशयाचा पत्रव्यवहार आम्ही गेल्या जानेवारी महिन्यापासून करत आहोत त्यावर जी कार्यवाई आपण केली त्यासंबंधीचे कागदपत्र आम्हांस द्यावेत व माहिती द्यावी | आपणांस आवश्यक असलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.<br><br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (फ) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो;<br><br>त्यानुसार आपणांस नेमके कोणते दस्तावेज हवेत याचा बोध होत नाही. |

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in